VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | एकविसाव्या शतकातील राज्यघटने समोरील आव्हाने<br>**डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड** | १-५ |
| २ | एकविसाव्या शतकातील भारतीय लोकशाही : आव्हाने आणि पुढील वाटचाल<br>भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>**प्रा डॉ. कविता सोनकांबळे** | ६-९ |
| ३ | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने<br>**प्रा. डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे** | १०-१४ |
| ४ | नागरी समाज व लोकशाही<br>**डॉ. दिपक एस. वाघमारे** | १५-१८ |
| ५ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने<br>**डॉ. बिरंगणे एस. एस.** | १९-२१ |
| ६ | भारतीय अर्थव्यवस्था : एक चिंतन<br>**डॉ. पांडुरंग व्ही. पांचाळ** | २२-२५ |
| ७ | नागरी समाज आणि भारतीय लोकशाही<br>**प्रा. दिक्षीत एस. डी.**<br>**प्रा. डॉ. पिंपळे बी. एस.** | २६-२९ |
| ८ | समाज लोकशाही आणि स्त्रिया<br>**आरती धनवे** | ३०-३४ |
| ९ | भारतीय न्यायपालिका २१ व्या शतकातील आव्हाने<br>**डॉ. दाणे बी. एल.** | ३५-३७ |
| १० | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने<br>**प्रा. कांबळे शिवाजी ईरबा** | ३८-४० |
| ११ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने व उपाय<br>**सुभाष पोले** | ४१-४६ |
| १२ | भारतातील लोकशाही : आव्हाने व बळकटीकरणासाठी आवश्यक बाबी<br>**महेशकुमार एकनाथ जाधव** | ४७-५१ |
| १३ | लोकशाही व राष्ट्रीय एकात्मता<br>**प्रा. डॉ. एस. के. लेखणे**<br>**प्रा. डॉ. एस. ई. देगलुरकर** | ५२-५४ |

# ३. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**प्रा. डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय, गेवराई, लोकप्रशासन अभ्यासमंडळ, सदस्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ख्याती आहे. भारत हा देश विविधतेने नटलेला देश आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही पुढे अनेक समस्या व आव्हाने आहेत. त्यापूर्वी लोकशाही म्हणजे नेमके काय ? तर लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे, खुल्या व नि:पक्षपाती निवडणूकाद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे चालणारे राज्य सामान्यपणे लोकशाहीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रमुख प्रकार मानले जातात. आधुनिक काळात 'लोकशाही' हा शब्दप्रयोग सामान्यपणे अप्रत्यक्ष लोकशाही या अर्थानेच केला जातो. भारतामध्ये संसदीय लोकशाही हा प्रकार अस्तीत्वात आहे. संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळ आणि संसद परस्परांवर अवलंबून असतात आणि मंत्रिमंडळ हे संसदेला जबाबदार असते.

आधुनिक लोकशाहीत नागरिकांकडे फक्त मतदारांचीच भूमिका असते. दोन निवडणूकामधील कालावधीत नागरिकांकडे काहीच काम नसते. त्यामुळे शासनाच्या कार्यपध्दतीत नागरीकांचा सक्रीय सहभाग नसतो आणि काही निवडक लोकच प्रत्यक्षात राज्यकारभार करीत असतात. व त्यांचेच समाजावर वर्चस्व असत. अशा स्वरुपाची लोकशाही भारतामध्ये अस्तीत्वात आहे.

लोकशाहीचे जे मूलतत्वे आहेत. स्वतंत्र, समता, न्याय, बंधुत्व या तत्वावर भारतीय लोकशाही टिकून आहे असे म्हणता येईल. 1947 ला आपला भारत देश स्वतंत्र झाला. गेल्या 70 वर्षात भारताने अनेक क्षेत्रात दैदिव्यमान प्रगती केली आहे. या काळाचे परिक्षण केल्यास अपणास अनेक सकारात्मक आणि नकारात्मक बदल झाल्याचे दिसून येतात. पण भारत स्वतंत्र झाला. तेंव्हा ही भारतीय लोकशाही पुढे अनेक आव्हाने होती पण त्यातूनही मार्ग काढून आज भारत हा विकासाच्या वाटेवर कार्यरत आहे.

भारतीय लोकशाही ही जगात आदर्श लोकशाही म्हणजे ओळखली जाते. जगातील अनेक युरोपीय देशात लोकशाही असल्याचे दिसून येते पण त्या देशांची लोकसंख्या मर्यादित आहे. भारत लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश असून अनेक बाबतीत विविधता असलेला एकमेव देश आहे.

स्वतंत्र भारताने स्वातंत्र्यानंतर सर्वच क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक विविधता जोपासून भारताने एक राष्ट्र म्हणून समाधानकारक वाटचाल केली आहे. संवेदनशील लोकशाही, स्वतंत्र न्यायपालिका तसेच वैविध्यपूर्ण आणि विस्तृत उदयोग क्षेत्र येथे रुजल आहे. अनेक आर्थिक आणि लष्करी धक्के पचविणाऱ्या भारताने न्याय्य आणि समानतेवर आधारित विश्वाची निर्मिती करण्याच्या दृष्टिने मोठे योगदान दिले आहे. तरीही आजही देशासमोर अनेक आव्हाने कायमपणे समोर येतात. ती आव्हाने पुढील प्रमाणे सांगता येतील.



111

**विषमता**

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असणारी पहिली अट म्हणजे समाजामध्ये प्रखरपणे जाणवू शकेल अशी विषमता असू नये. व्यक्ति व्यक्तित धर्म, जात, वर्ण, वंश, भाषा, लिंग इत्यादी कारणावरुन कोणताही भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी देणे लोकशाहीचे उदिष्ट आहे. परंतू प्रत्यक्षात असे घडताना दिसत नाही. कायदयाने विषमता नष्ट केली तरी भारतासारख्या देशात आजही समाजात स्पृश्य-अस्पृश्य, श्रेष्ठ -कनिष्ठ, उच्च-निच्च अशी भेदभावांची भावना दिसून येते. गेल्या 15-20 वर्षातील आर्थिक सुधारणामुळे विकासाचा दर वाढला ही गोष्ट समाधानकारक व स्वागतार्ह असली, तरी त्याच्या फायदयाचा वाटप मात्र फार पूर्वीपेक्षा अधिक विषम होत चालला आहे. विविध प्रकारच्या लोककल्याणकारी विकास कार्यक्रमात हजारो कोटी रुपये खर्च होत असले तरी गरीब लोकांपर्यंत अशा विकासाचे फायदे पोहचत नाहीत. विविध मार्गाने आपले हितसंबंध जोपासण्यासाठी निर्माण केलेली एक भ्रष्ट व समांतर अशी व्यवस्था त्याला जबाबदार आहे. परिणामी स्वातंत्र्याच्या 70 वर्षानंतरही देशातील सुमारे 30 ते 35 % जनता दारिद्रय रेषेखाली आहे. लोकशाही अधिक कार्यक्षेम होण्यासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील विषमतेचे उच्चाटन होणे आवश्यक आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत असताना पहावयास मिळत आहे. त्यामुळे स्वातंत्र्याच्या सत्तरी नंतर देखील विषमतेची दरी रुंदावत चालली आहे. सहाजिकचे विषमता हे लोकशाही समोरील खूप मोठे आव्हान आहे.

**दहशतवाद**

आज देशात विविध भागामध्ये दहशतवादयाकडून घातपात, बॉम्बस्फोट, लष्करावरील हल्ले घडवून आणले जात आहेत. दहशतवादामुळे सामाजिक शांतता धोक्यात येते जी लोकशाहीच मारक आहे. आपले राजकीय हित साधन्यासाठी दहशतवादात हिंसेचा वापर केला जातो आणि हे लोकशाहीस अमान्य आहे. आज भारतात कश्मीर आणि पूर्वोत्तर राज्यात मोठया प्रमाणावर दहशतवादी कार्यवाहया होत आहेत. दहशतवादी देशाचे विभाजन करुन कश्मीरला स्वतंत्र करण्याची भाषा करीत आहेत. अल-कायदा, लष्कर-ए-तौयबा या अतिरेक दहशतवादी संघटनांनी भारतात अशांतता पसरविण्याचे कार्य सुरु केले आहे आणि या कारवाईत स्थानिक राजकारणी आणि फुटीरतावादी लोक पाठबळ देतांना दिसतात. एखादया ठिकाणी घातपात करावयाचा असेल तर त्याठिकाणची पूर्ण माहिती असावी लागते. ती मिळविण्यासाठी दहशतवादी स्थानिक लोकांची मदत घेतात. त्याच बरोबर घातपाताचे साहित्य त्या ठिकाणी पोहचविण्यासाठी स्थानिकांचे सहकार्य घेतले जाते. याचे जिवंत उदाहरण म्हणजे 14 फेब्रुवारी रोजी झालेला पुलवामा येथेली लष्करी जवानांच्या ताफ्यावरील हल्ला होय. आज भारताला परकीय, अंतर्गत अशा दोन्ही स्वरुपाच्या दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. दहशतवादामुळे धर्मा-धर्मात तेढ निर्माण होऊन राष्ट्रीय ऐक्य व सार्वभामत्वाला धोका निर्माण होतो. त्यामुळे दहशतवाद हे एक भारतीय लोकशाहीपुढील आव्हान म्हणून समोर येते.

**सत्ताभिलाषी राजकारण आणि प्रबळ विरोधी पक्षाचा अभाव**

भारतामध्ये आज अनेक राजकीय पक्ष निर्माण झालेले आहेत. आणि प्रत्येक राजकीय पक्षाचा उद्देश हा सत्ता मिळविणे असल्यामुळे आज भारताचे राजकारण केवळ सत्ताकेंद्रीत झाले आहे. त्यामुळे भारतीय लोकशाहीवरील सर्वसामान्य लोकांचा विश्वास कमी झाला आहे. कारण राजकीय पक्ष हे केवळ सत्ता अश्वासनाची खैरात करुन जनतेला मिळविण्याचे साधन समजतात.

सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष हे लोकशाहीचे दोन स्तंभ आहेत. पण विरोधीपक्ष जर दुबळा असेल तर लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. लोकशाही शासन प्रणालीत विरोधी पक्ष महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो. प्रबळ विरोधी पक्षाचे महत्व विशद करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'विरोधीपक्ष नसल्यास लोकांचे मुलभूत हक्क धोक्यात येतात. कारण ह्या हक्कांची पायमल्ली करणाऱ्या सत्ताधारी पक्षाला कोणीच जाब विचारु शकत नाही.' आंबेडकरांनी संतुलीत पक्ष पध्दतीचा पुरस्कार केला. त्यामुळे प्रादेशिक पक्षांची निर्मिती आणि प्रबळ विरोधीपक्षाचा अभाव हे देखील लोकशाही समोरील आव्हाण बनत चालले आहे.

**भ्रष्टाचार**

भ्रष्टाचार ही भारतीय लोकशाहीला लागलेली कीड आहे. भारतात भ्रष्टाचार हा कर्करोगाप्रमाणे पसरला आहे. आज भ्रष्टाचाराने लोकांची न्याय व्यवस्था हिरावून घेतली आहे. विकासाची वाट कुंठीत करुन टाकली आहे. गरीबांच्या कल्याणासाठी दिला जाणारा पैसा खाजगी खिशात जात आहेत. दिल्लीपासून गल्लीपर्यंत मोठया प्रमाणात पुरेशी लाच दिल्याशिवाय कुठल्याही निर्णयावर शिक्का बसत नाही. आपल्या देशात मंत्र्याचा भ्रष्टाचार ही महत्त्वाची बातमी ठरवण्याचे दिवस केव्हाच संपले आहेत. 2008 ते 2010 या काळात पंतप्रधान कार्यालयाच्या देखरेखीखाली दूरसंचार खात्यात 1 लाख 76 कोटी रु. भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी संयुक्त संसदीय समिती नेमण्यास केंद्रसरकारने नकार दिला. तसेच आज चिक्की घोटाळा असेल किंवा राफेल सारखा घोटाळा देशभर गाजत आहे. इ.स. 2009 मध्ये Transparency International of India या संस्थेने विविध 180 देशांचा अभ्यास करुन भारताचा 84 वा क्रमांक लागतो असे आपल्या अहवालात नमूद केले आहे. लोकप्रतिनिधी व नोकरशहा यांच्या संगनमताने भ्रष्टाचार अखंडीतपणे चालू आहे. परिणामी देशात सर्व सामान्य लोकांचा लोकशाहीवरील विश्वास कमी होत चालला आहे.

**वाढती लोकसंख्या**

भारताची लोकसंख्या जगात दुसऱ्या क्रमांकावर पोहचली आहे. आज भारताची लोकसंख्या स्फोटक पातळीवर पोहोचलेली असून वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गोष्टी पुरविण्याबरोबरच जगाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सर्वांगिण विकास साधने गरजेचे आहे. ग्रामीण भागातील लोकांचे शहरी भागात होणारे स्थलांतर आणि त्यामुळे शहरी भागाच्या विकासावर त्याचा विपरीत परिणाम होताना दिसून येतो. यातूनच झोपडपट्टीची समस्या,आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. 1950 मध्ये आपल्या देशाची लोकसंख्या जेवढी होती तेवढी लोकसंख्या आजमितीस दारिदयरेषेखाली आणि अशिक्षित आहे. त्यामुळे अशिक्षतांच्या मोठया लोकसंख्येला शिक्षण देणे, त्यांना समाजाच्या प्रवाहात अणणे.अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते.

**महिला प्रतिनिधीत्व**

भारतात पुरुषप्रधान समाजव्यवस्था आहे. समाजात महिलांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. लोकशाहीचा स्वीकार केल्यानंतर स्त्री - पुरुष समानतेचा विचार पुढे आला. राज्यघटनेत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले आहे. राजकारणात पुरुषांच्या बरोबरीने महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळालेली नाही. शिक्षित महिलांना हक्काची जाणीव झाली पण अशिक्षित महिलांच्या हक्कांचे उल्लंघण वारंवार होतांना दिसते. भारतीय समाजात जसे महिलांना दुय्यम स्थान आहे. तसेच लोकशाही

...पातळीवरतेही महिला दुय्यमच राहिल्या आहेत. महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला असला तरी त्या कुटूंबातील पुरूष सांगतील ...त्या पक्षाला व उमेदवाराला मतदान करतात. 73 व 74 व्या घटना दुरूस्तीने स्थानिक शासन संस्थांमध्ये महिलांना 33 टक्के राखीव जागा मिळाल्या आज ते प्रमाण 50% इतके करण्यात आले आहे. परंतु महिला प्रतिनिधीचा कारभार पुरूष पाहतात असे अनेक ठिकाणी दिसून येते. त्यामुळे नेतृत्व करण्याची संधी पुरूषांच्या बरोबरीने प्राप्त झालेली नाही. म्हणजे समाज रथायी दोन चाके म्हणून समाजला जाणार समाजाचा एक मोठा भाग महिला यांचा घटनेने दिलेला दर्जा मिळवून देण्याचे आव्हान भारतीय लोकशाही पूढे आहे.

प्रचंड गरिबी, गलिच्छपणा, उर्जा आणि इंधन क्षेत्रातील मोठी तूट, पर्यावरणाचा ढासळलेला समतोल, तसेच धर्म, जात,भाषा आणि लिंगाधारित भेदभाव, बेबनाव, त्यामुळे सामाजिक ऐक्यावर होत असलेले गंभीर परिणाम, ही काही प्रमुख आव्हाणे भारतीय लोकशाही समोर आहेत. त्यातच जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या आर्थिक आणि भू- राजकीय आव्हाणांची भर पडली आहे एकाच वेळी प्रचंड संख्येने असलेल्या गरिबांचे पोट भरणे आणि जगभरातील तांत्रिक आणि आर्थिक दृष्ट्या समृध्द असलेल्या देशांशी स्पर्धा करून आपले स्थान निर्माण करण्याचे आव्हाण भारतापुढे आहे.

देशापुढील ही प्रचंड आव्हाने पेलण्यासाठी आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी डॉ. रघुनाथ माशालकर यांनी पंचसूत्री कार्यक्रमावर भर देण्याची गरज असल्याचे सांगीतले यामध्ये विद्यार्थी केंद्रित शिक्षण, स्त्रीकेंद्रित समाज,मानवकेंद्रित विकास, ज्ञानकेंद्रित नागरिक आणि नवसंकल्पना केंद्रित भारत याचा समावेश होतो.

नवभारताचा पाया रचणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे आजच्या शिक्षण व्यवस्थेचा प्रश्न आहे.शाळा मधून मिळणारे शिक्षण पाहता प्रत्येक क्षणाला बदलणारे तंत्रज्ञान आत्मसात करू का? आपल्या देशाच्या सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आकृतिबंधाला विज्ञानाचा पाया देण्यात यशस्वी होऊ का? असा प्रश्न पडतो विज्ञानाचे शिक्षण हे प्रयोगाद्वारे शिकणे किंवा कृतीतून शिकणे या आधारावर आणले पाहिजे तरच तंत्रसमृध्द अशा भविष्यकाळातील आव्हाणे पेलण्यासाठी आपली पुढची पिढी समक्ष असेल.

आज माणूस समाजापासून दूर चालला आहे असे समाजशास्त्रज्ञ म्हणतात. यावर जवळ जाणार उपाय म्हणून ...पध्दती जवळची वाटते. कारण स्त्री घरातील छोटया गोष्टी पासून मोठ-मोठया गोष्टी देखील व्यवस्थीतपणे पार पाडते. ... आज स्त्रीयांना पुरूषांच्या तुलनेत दुय्यम वागणुक मिळते.1993 च्या हयुमन डेव्हलपमेंट रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, ... देशात पुरूषांसारखी वागणूक स्त्रियांना मिळत नाही. म्हणून स्त्रियांना त्यांचे अधिकार आणि कर्तव्याची जाणीव करून देणे अपेक्षीत आहे.

आपल्याला मानवजात टिकवायची असेल तर प्रगतीला मानवी चेहरा असायला हवा असे म्हटले जाते. जगाची लोकसंख्या 2050 पर्यंत 10 ते 12 अब्जांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. पृथ्वीची धारणक्षमता 2 ते 3 अब्जलोकसंख्या सुखाने ... माणले जाते. त्यातही आपण अंगीकृत केलेली जीवन शैली शाश्वत विकासाच्या दिशेने नेणारी नाही. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल जसा ढळतो, तशीच विषमतेची दरीही रूंदावत जाते. एकीकडे अशाश्वत जावनशैली आणि दुसरीकडे ... दारिद्र्य, अशी ही दरी कमी करण्यासाठी मानवकेंद्रित विकास होणे गरजेचे आहे.

उद्याच्या विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित जगात केवळ असेच देश स्पर्धेत टिकू शकतात, जे ज्ञानाधारित समाजातली ... अन्य देशांचे अस्तित्व असून नसल्यासारखेच होऊन जाईल भारताला जर ज्ञानाधारित समाजाची निर्मिती



114

करायची असेल,तर प्रत्येक नागरिकाला ज्ञानाचा पाईक व्हावे लागेल. मग तो शेतकरी असो, ग्रामीण महिला असो किंवा अन्य कोणीही असो अज्ञानाच्या अंधकारात राहील्यामुळे समाजातील मोठा भाग कुकीर्त हेतू असलेल्या व्यक्तीची गुलामगिरी करण्यास प्रयत्न करेल.

ज्ञान महत्वाचे असेल, तरी त्याला प्रयोगशीलतेची जोड असल्याशिवाय ते पूर्ण बनत नाही. नवसर्जनाची प्रक्रिया ज्ञानाचे रूपांतर संपत्तीत आणि समाजाच्या आनंदात करते. भारताचा विचार करता येथील लोक दैववादावर अधिक विश्वास ठेवतात त्यामुळे प्रयोगशिलतेवर मर्यादा येतात. परंतु प्रयोगशीलता हीच संस्कृती बनल्यास नवसर्जन होत राहिल. हरित क्रांती, धवलक्रांती यासारख्या घडामोडी देशाला पुढे नेणाऱ्या ठरल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने बदल घडत असून जगाबरोबर चालायचे झाल्यास प्रयोगशिलतेशिवाय पर्याय नाही.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की, भविष्यात लोकशाहीला अधिक बळकट करावयाचे असेल तर देशातील सामान्य नागरिकाला सुरक्षितता, शांतता, न्याय मिळाला पाहिजे. वरील घटकांचा भविष्यकाळात कटाक्षाणे अंगीकार केला तर समाजातील प्रत्येक नागरीकांना लोकशाहीबद्दल आस्था वाटेल आजच्या परिस्थितीत लोकशाही समोरील आव्हानांना सामोर जाण्यासाठी कायदेविषयक बाबींना नैतिकतेची आणि विज्ञानाची जोड देणे गरजेचे वाटते.

**संदर्भ ग्रंथ सुची**

1. प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, प्राचार्य डॉ. अलीम वकील. प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे भारतीय राज्यघटना, राजकारण आणि कायदा डायमंड पब्लिकेशन्स, 2012
2. डॉ. पंडित नलावडे, भारतीय लोकशाही स्थिती आणि गती, चिन्मय प्रकाशन,2011
3. बोराळकर, जोशी, चोपडे, भारतीय राजकीय व्यवस्था, पिंपळापुरे ॲण्ड कं पब्लिशर्स, नागपूर 1989
4. प्रा. बी. बी. पाटील, प्रा.सौ. उर्मिला चव्हाण, राज्यशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, 2012
5. प्रा.डॉ. सतीश ठोंबरे, भारतीय राज्यपध्दती कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, 2010
6. https://www.google.com.
7. https://www.thinkmaharashtra.com.